दूरध्वनी : २५३३ १२११
२५३३ १५९०

# ठाणे महानगरपालिका , ठाणे.

महापालिका भवन , सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग , चंदनवाडी , पांचपाखाडी, ठाणे - ४००६०२
THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

---

**ठाण्यात मतदान जनजागृतीपर बाईक रॅलीचे आयोजन**
**बाईक रायडर्स देणार मतदान जनजागृतीचा संदेश**

**ठाणे(२५):**लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ करिता 29 एप्रिल रोजी होत असलेल्या मतदानादिवशी मतदानप्रक्रियेत जास्तीत जास्त संख्येने सहभागी होवून आपले राष्ट्रीय कर्तव्य बजावावे ही भावना जनमानसात रुजवण्यासाठी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्यावतीने शनिवार दिनांक २७ एप्रिल २०१९ रोजी सकाळी १० वाजता जनजागृतीपर बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांच्या हस्ते ध्वज दाखवून जिल्हाधिकारी कार्यालय येथून या रॅलीला सुरुवात होणार असून आरफोरसी संस्थेचे सुमारे २५० बाईक रायडर्स या रॅलीत सहभागी होणार आहेत.

आरफोरसी या सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या संस्थेचे बाईक रायडर्स या रॅलीत सहभागी होणार असून विविध लोकोपयोगी उपक्रम या संस्थेच्यामार्फत राबविले जातात. रक्तदान शिबीर, पढेंगा इंडिया तो बढेंगा इंडिया, आर्मी डे राईड, 'माझं शहर स्वच्छ शहर',चिल्ड्रन डे राईड आदी सामाजिक उपक्रम आरफोरसीच्यावतीने राबविले जातात. देशभरात सर्वत्र लोकसभेचे वारे वाहू लागले असून नागरिकांनी आपला अमूल्य असा मतदानाचा अधिकार बजावून आपले कर्तव्य पार पाडावे. तसेच मतदान करून लोकशाही बळकट करावी याकरिता सामाजिक बांधिलकी म्हणून आरफोरसी यांच्यावतीने या जनजागृतीपर रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. मतदान जनजागृतीचा संदेश देत या रॅलीत जवळपास २५० बाईक रायडर्स सहभागी होणार आहेत. यावेळी आरफोरसीचे सुशील कुलकर्णी, अजय दुर्वास, राजीव शाह,सांकेत सोमान, श्री.बोरिस,श्रीमती श्रेया,निकिता राहलकर आदी उपस्थित राहणार आहेत.

ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय येथून जवळपास २४ किलोमीटर प्रवासाच्या या जनजागृती रॅलीला सुरुवात होणार आहे. ही रॅली तलाव पाळी - राम मारुती रोड - गोखले मार्ग - तीन हात नाका - वागळे इस्टेट मार्गे अँप्लाब सर्कल - पासपोर्ट केंद्र - कोरे टॉवर्स - उपवन तलाव - काशीनाथ घाणेकर नाट्यगृह - हॅपी व्हॅली -मानपाडा - ब्रह्मांड -कोलशेत रोड - बाळकुम फायर स्टेशन - कापूरबावडी - कोर्ट नाका - तलाव पाळी या मार्गे राम गणेश गडकरी रंगायतन येथे या रॅलीची सांगता होणार आहे.